## संक्षिप्त फौजदारी खटला क्र.९७०/२०२२ मधील न्यायनिर्णय

**[CNR No. MHCH06-001464-2022]**

**(आज दिनांक ०६ मे २०२४ रोजी घोषीत)**

**निशाणी क्र.०५ वर**

अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता आणि दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकला असतां खालील मुद्दे माझ्या अवलोकनार्थ उपस्थित झाले आणि त्यावर निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेद्वारे दिले आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १ | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २१/०८/२०२२ रोजी सायंकाळी ५:०० ते ५:३० वाजेच्या दरम्यान बी.टी.एस.प्लॉट, शिवाजी वॉर्ड, बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जिल्हा – चंद्रपूर येथे आरोपी हा त्याच्या ताब्यात विनापरवाना व बेकायदेशीररित्या एकुण २० नग प्रत्येकी ९० मिली 'सोनी सौफ' कंपनीची देशी दारु, चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने, बाळगतांना मिळून आला व त्याप्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये दंडनिय अपराध केला ? | **नकारार्थी** |
| २ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

२) आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने केवळ राजु बबनराव राठोड (साक्षीदार क्र.१) या पंच साक्षीदाराला तपासले. पुरेशी संधी देउन देखिल अभियोग पक्ष त्यांच्या इतर साक्षीदारांची उपस्थीती संपादीत करु शकला नसल्याने निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग

पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपी विरूध्द गुन्हया संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**<u>मुद्या क्र.१ करीताः–</u>**

३) अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी, आरोपी स्वतःच्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी देशी दारु विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आला, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

४) त्या अनुशंगाने अभियोग पक्षाने राजु बबनराव राठोड (साक्षीदार क्र.१) याची साक्ष नोंदविली. त्याने त्याच्या पुराव्यात असे नमुद केले आहे की दिनांक २१/०८/२०२२ रोजी बल्लारपूर पोलिसांनी त्याला पंचनाम्याकामी कोठेही बोलाविले नव्हते. बल्लारपूर पोलिसांनी त्याच्यासमक्ष कुठलाही घटनास्थळ पंचनामा तयार केलेला नसून त्याच्यासमक्ष काहीएक जप्त केलेले नाही. सदर साक्षीदारास अभियोग पक्षाने उत्तरसुचक प्रश्न विचारून उलट तपास घेतला, परंतु त्याने खटल्याच्या संदर्भात कोणतीही महत्वपूर्ण माहिती दिली नाही. त्यामूळे सदर साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षास मदत करत नाही.

५) अभियोग पक्षाने तपासी अंमलदार व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविली नसल्यामुळे फिर्याद, छापील पहिली खबर व घटनास्थळ जप्ती पंचनामा सिध्द होवु शकला नाही. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल असला तरी तो अहवाल जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबतचा आहे, तसेच नमुन्यासाठी जप्त मुद्देमालापैकी वेगळा काढण्यात आला होता, इत्यादी बाबी सांगणारा कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सी.ए. सॅम्पल काढून चंद्रपूर येथील न्यायवैदयक प्रयोगशाळा येथे सिल करून सुरक्षितपणे पोहचविले याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेला नाही. अभियोग पक्षाने ठाणा मोहरील यास तपासले नाही व मुद्देमाल ठाणा मोहरील यांच्या ताब्यात दिल्याबाबतचे

स्टेशन डायरीमधील व संबंधीत रजिस्टरमधील नोंद दाखल केली नाही. सबब, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरून जप्त करण्यात आला, ही बाब पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही.

६) त्यामुळे संचीकेवरील एकंदरीत पुराव्यात अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचा महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा कलम ६५ (ई) चा गुन्हा आरोपीने केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही, या निष्कर्शावर मी पोहोचलो आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रं.२ करीता–**

७) वरील मुदयांचा नकारार्थी निष्कर्श पाहता आरोपी हा ठेवलेल्या आरोपामधुन निर्दोश मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **राजेश ओमप्रकाश तिवारी** याची महाराष्ट्र दारूबंदी कायदा/महाराष्ट्र प्रतिबंध कायदा कलम ६५ (ई) अन्वयेच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल एकुण २० नग प्रत्येकी ९० मिली 'सोनी सौफ' कंपनीची देशी दारु अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग चंद्रपूर यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी.

३. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपी हा अपील दाखल झाल्यास, अपील न्यायालयासमोर हजर राहील, याकरीता त्याने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत १५०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

SONIYA NARENDRA SAWALESHWARKAR

Digitally signed by SONIYA NARENDRA SAWALESHWARKAR
Date: 2024.05.07 17:40:21 +0530

(**श्रीमती एस.एन. सावळेश्वरकर**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट क्र.१), बल्लारपूर.

स्थळः बल्लारपूर
दिनांकः ०६/०५/२०२४